# महिला व बालविकास आयुक्तालय

२८,राणीचा बाग ,जुन्या सर्किट हाउस शेजारी ,पुणे ०१.

**प्रसिध्दीपत्रक**

आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अधिनस्त आस्थापनेवरील गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड या संवर्गातील **(१)** संरक्षण अधिकारी, गट- ब (अराजपत्रित)- २ पदे **(२)** परिविक्षा अधिकारी,गट-क ७२ पदे **(३ )** लघुलेखक (उच्चश्रेणी), गट-क १ पद **(४)** लघुलेखक (निम्नश्रेणी), गट-क २ पदे **(५)** वरिष्ठ लिपीक/सांख्यिकी सहायक, गट-क ५६ पदे **(६)** संरक्षण अधिकारी (कनिष्ठ), गट-क ५७ पदे **(७)** वरिष्ठ काळजी वाहक, गट-ड ४ पदे **(८)** कनिष्ठ काळजी वाहक, गट-ड ३६ पदे **(९)** स्वयंपाकी, गट-ड ६ पदे भूतपुर्व दुय्यम सेवा मंडळाच्या कक्षेतील निम्न नमुद सरळसेवा कोटयातील रिक्त असलेली पदे भरण्याकरीता पात्र उमेदवारांच्या संगणक आधारीत **वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची ऑनलाईन परिक्षा दि.१०-२-२०२५ ते दि.१३-२-२०२५ व दि.१७-२-२०२५ या कालावधीत** विविध सत्रामध्ये आयोजित करण्यात आलेल्या होत्या.

१. **उक्त नमुद ऑनलाईन लेखी परीक्षेचा पदनिहाय/संवर्गनिहाय निकाल** www.wcdcommpune.com या **संकेतस्थळावर दिनांक २-६-२०२५ प्रसिध्द करण्यात आलेला आहे.**

२. **१.**लघुलेखक (उच्चश्रेणी) व **२.**लघुलेखक (निम्नश्रेणी) **३.**स्वयंपाकी या पदांच्या **ऑनलाईन लेखी परीक्षेत किमान ४५% गुण प्राप्त करुन** व्यावसायिक परीक्षेस पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी उक्त नमुद संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.तसेच **१.**संरक्षण अधिकारी गट ब (अराजपत्रित) २.वरिष्ठ काळजी वाहक गट-ड या पदाची तात्पुरती निवड व प्रतीक्षा यादी उक्त नमुद संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे

३. व्यावसायिक परीक्षेस पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या यादीबाबत किंवा तात्पुरत्या निवड/प्रतीक्षा यादीवर आक्षेप असल्यास संबधीत उमेदवारांनी ते या प्रसिध्दी पत्रकाच्या दिनांकापासुन ७ दिवसांच्या आंत आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे २८ राणीचा बाग, व्हीआयपी सर्किट हाऊस शेजारी, (बार्टी कार्यालय परीसर) पुणे -४११००१ या पत्त्यावर लेखी स्वरुपात आवश्यक त्या कागदपत्रांसह सादर करावेत.विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेले आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत याची नोंद उमेदवारांनी घ्यावी.

४. **१.**लघुलेखक (उच्चश्रेणी) व **२.**लघुलेखक (निम्नश्रेणी) **३.**स्वयंपाकी या पदाकरीता लेखी परीक्षा व व्यावसायिक परीक्षेत प्राप्त झालेल्या एकत्रित गुणांच्या आधारे निवड व प्रतिक्षा यादी प्रसिध्द करण्यात येणार आहे.**सदर पदाच्या व्यावसायिक परीक्षेस अनुपस्थित राहणाऱ्या उमेदवारांचा समावेश निवड व प्रतिक्षा यादीमध्ये करण्यात येणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

५. **संबधीत उमेदवार लेखी किंवा व्यावसायिक परीक्षेस पात्र झाले किंवा तात्पुरत्या निवड व प्रतिक्षा यादीमध्ये समावेश झाला, याचा अर्थ संबधित उमेदवार त्या पदावर नियुक्तीस पात्र झाला असे गृहीत धरण्यात येणार नाही.** तात्पुरत्या निवड व प्रतिक्षा यादीमध्ये समावेश झालेल्या उमेदवारांच्या जाहिरातीमध्ये नमुद अटी व शर्तीनुसार मुळ कागदपत्रांची पडताळणी/समांतर आरक्षणाची पडताळणी झाल्यानंतरच संबधीत उमेदवारांच्या नियुक्तीबाबत अंतिम निर्णय घेण्यात येईल, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

६. **सरळसेवा भरती प्रक्रियेमध्ये समाविष्ट इतर संवर्गाची निवड व प्रतिक्षा यादी प्रसिध्द करण्याबाबतची कार्यवाही अंतिम टप्यात असुन भरती प्रक्रियेबाबत पुढील** अदयावत सूचना/प्रसिध्दीपत्रक/व्यावसायिक व कागदपत्र पडताळणीचे वेळापत्रक याबाबतची माहिती उपलब्ध करुन घेण्यासाठी महिला व बाल विकास विभागाच्या https://www .wcdcommpune.com संकेत स्थळाला वेळोवेळी भेट देण्याबाबत सर्व उमेदवारांना याव्दारे आवाहन करण्यात येत आहे.

दिनांक :- १५/७/२०२५
स्थळ :- पुणे

**(नयना अर्जुन गुंडे)** भा.प्र.से
**आयुक्त**
**महिला बाल विकास**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**